# लोकनियुक्त नगराध्यक्षपदी शिवसेनेचे डॉ. परीक्षित बाविस्कर

सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

**ग्लोबल महातेज**

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ९१ | सोमवार, दि. २२ डिसेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com


# पालिका निवडणुकीत 'शविआ' व शिवसेनेला झुंजवून अपक्षांची मुसंडी

## अपक्ष १३, 'शविआ' १२, शिवसेना १०, तर 'मविआ'ला १ जागा

### लोकनियुक्त नगराध्यक्षपदाचा निकाल



| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) डॉ. परीक्षित श्रीराम बाविस्कर | शिवसेना (शिंदे गट) | ३०,८५६ |
| २) जितेंद्र हरिश्चंद्र ठाकूर | शविआ | २२,२०८ |
| ३) उमाकांत सुकलाल ठाकूर | अपक्ष | १८७७ |
| ४) राधाबाई संजय पवार | अपक्ष | १८५८ |
| ५) अमोल रवींद्र भिल | अपक्ष | ४०४ |
| ६) सखुबाई अमृतलाल भिल | अपक्ष | २०५ |



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत लोकनियुक्त नगराध्यक्षपदी शिवसेनेचे (एकनाथ शिंदे गट) उमेदवार डॉ. परीक्षित श्रीराम बाविस्कर हे मोठ्या मताधिक्क्याने विजयी झाले. त्यांनी शहर विकास आघाडीचे उमेदवार जितेंद्र हरिश्चंद्र ठाकूर यांचा पराभव केला. नगरसेवकपदाच्या निकालात अपक्ष उमेदवारांनी शहर विकास आघाडीसह शिवसेनेच्या उमेदवारांना अक्षरशः झुंजविले. अपक्ष १३, 'शविआ' १२, शिवसेना १०, तर महाविकास आघाडींतर्गत राष्ट्रवादीला (शरदचंद्र पवार गट) एका जागेवर विजयी तुतारी वाजविली आहे. प्रभाग क्र. ८ 'अ'मध्ये 'शविआ'चे सचिन बळवंत पाटील हे आधीच बिनविरोध निवडून आले आहेत. नगराध्यक्ष शिवसेनेचा निवडून आला असला, तरी अपक्षांनी मारलेली मुसंडी पाहता त्यांचे संख्याबळ पालिकेत निर्णायक ठरण्याची शक्यता व्यक्त होत आहे. हा निकाल म्हणजे अमळनेरमधील सर्वच राजकीय पक्षनेतृत्वांना आत्मपरीक्षण करायला लावणारा आहे. मतदारांनी २५ नव्या चेहऱ्यांना संधी दिली आहे. मात्र, त्यातील १० विजयी उमेदवारांना राजकीय वारसा होता. त्यांच्या परिवारातील कोणीना कोणी नगरसेवक होते. शंभर टक्के कोरी पाटी असलेले १५ उमेदवार विजयी झाले आहेत. १८ महिला विजयी झाल्या आहेत.

आमदार अनिलदादा भाईदास पाटील, खासदार स्मितताई वाघ व माजी आमदार कृषिभूषण साहेबरावदादा पाटील यांनी शहर विकास आघाडी, तर माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांनी शिवसेनेचे (एकनाथ शिंदे गट) नेतृत्व केले. त्यामुळे आघाडी व शिवसेना या दोघांनी ही निवडणूक अतिशय प्रतिष्ठेची केली होती. अखेरच्या क्षणापर्यंत उमेदवारी देतानाही दोन्हीही गटांना विविध आव्हानांचा सामना करावा लागला होता. तसेच काहींची नाराजीही सहन करावी लागली होती. मात्र यामध्ये अपक्षांच्या शक्तीचा नेमकेपणाने अंदाज दोन्हीही गटांच्या नेतृत्वाला घेता आला नाही, हे निवडणूक निकालातून दिसून आले आहे.

नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत शिवसेनेचे डॉ. परीक्षित बाविस्कर यांना ३०,८५६; तर 'शविआ'चे जितेंद्र ठाकूर यांना २२,२०८ मते मिळाली. डॉ. बाविस्कर यांनी तब्बल ८,६४८ मतांनी विजय मिळविला. या निवडणुकीत एकूण ५७ हजार ९६० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. दरम्यान, निवडणूक निकालानंतर आमदार अनिलदादा पाटील व जितेंद्र ठाकूर यांच्याशी संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही.

**अशी झाली मतमोजणी**

शहरातील इंदिरा भुवन येथे निवडणूक निर्णय अधिकारी निवृत्ती गायकवाड, अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार रूपेशकुमार सुराणा, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी गणेश शिंदे तसेच पालिका, महसूल व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत सकाळी १० वाजता मतमोजणीस सुरूवात झाली. सुरूवातीला पोस्टल मतांची मोजणी झाली. त्यानंतर ईव्हीएम मतांची मोजणी सुरू करण्यात आली. एकूण १८ प्रभागांसाठी १० फेऱ्यांमध्ये १२ टेबलांवर मतमोजणीची प्रक्रिया पार पडली. दोन प्रभागांतील निकालात विजयी उमेदवार व प्रतिस्पर्धी उमेदवार यांच्यात १०० ते २०० मतांचे अंतर असल्याने त्यांनी फेरमतमोजणीची मागणी केली होती. त्यानंतर त्या प्रभागांचीही तत्काळ फेरमतमोजणी करण्यात आली. दुपारी ३.३० वाजेपर्यंत सर्व प्रभागांतील निकाल जाहीर करण्यात आले. अतिशय शांततामय वातावरणात मतमोजणीची प्रक्रिया पार पडली. यासाठी पोलीस प्रशासनानेही आवश्यक ती खबरदारी घेत चोख बंदोबस्त ठेवला.


प्रभागनिहाय निकाल : उमेदवार व त्यांना मिळालेली मते पान ३ वर


### अनुभवी, प्रस्थापितांचा पराभव

या निवडणुकीत काही अनुभवी तसेच प्रस्थापितांना मतदारांनी नाकारल्याचे पाहावयास मिळाले. त्यात माजी उपनगराध्यक्षा सबनूरबी सलीम शेख, माजी नगरसेवक नरेंद्र चौधरी, माजी नगरसेविका ॲड. चेतना पाटील, प्रताप शिंपी, अनिता लांबोळे, राजेश पाटील, मनोज पाटील, प्रवीण पाठक, उज्ज्वला महाजन, विनोद कदम यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे.


### यांचा झाला पुनर्प्रवेश

प्रवीण गंगाराम पाटील
सौ. सविता योगराज संदानशिव
सौ. शोभाबाई भिवसन गढरे
श्रीराम भगवान चौधरी
पंकज पंडित चौधरी
सचिन विभाकर कासार
अनिल गंगाराम महाजन
प्रा. रामकृष्ण बापूराव पाटील
सौ. जयश्री अनिल पाटील
महेश प्रभाकर देशमुख
साहेबराव वसंत पवार
हे स्वतः नगरसेवक राहिले आहेत.



मी सर्वप्रथम अमळनेरच्या जनतेचे मनापासून आभार मानतो. जनतेने शिवसेना नेतृत्वासह माझ्यावर जो विश्वास टाकला आहे तो मी प्रामाणिकपणे सार्थ ठरवेन. अमळनेर शहराचा विकास करून जनतेच्या या उपकारांतून उतराई होण्याचा माझा संकल्प आहे. तो प्रत्यक्ष साकार करण्यासाठी सदैव कटिबद्ध राहील.

**– डॉ. परीक्षित बाविस्कर,**
लोकनियुक्त नगराध्यक्ष, अमळनेर.



निवडणूक प्रचारावेळी विरोधकांनी आमच्यावर टीका केली होती. त्यात मी नंदुरबारचा तर डॉ. बाविस्कर हे बाहेरचे आहेत, असे म्हटले होते. मात्र, अमळनेरच्या जनतेने निवडणूक निकालात आम्ही अमळनेरकरच आहोत, हे त्यांना एकप्रकारे सर्टिफिकेटच दिले आहे. आम्ही पालिकेत या सर्टिफिकेटच्या माध्यमातूनच विकासकामे करू. अमळनेरकर जनतेचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

**– शिरीषदादा चौधरी,** माजी आमदार, अमळनेर.

# उत्तम चारित्र्य व मोठ्या मित्र परिवारामुळे जितेंद्र झाबकांनी निर्माण केली उत्तम हवा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : खानदेश शिक्षण मंडळाचे अध्यक्ष असलेल्या जितेंद्र झाबकांना त्यांच्या विविध जाती- धर्माच्या असंख्य चहात्यांनी गळ घातल्यामुळेच ते कार्यकारी मंडळाच्या सदस्यपदी निवडणूक लढवित आहेत. उत्तम चारित्र्य आणि विविध जाती- धर्म, पक्ष यातील खूप मोठ्या संख्येने आणि अत्यंत प्रभावी असलेला मित्र परिवार ही श्री. झाबक यांची मोठी जमेची बाजू आहे. त्यातच त्यांना अनुभवी उद्योजक बिपिनबापू पाटील आणि स्वतः उमेदवार असलेल्या सौ. लिनाताई पाटील यांची भक्कम साथ लाभली आहे. परिणामी अल्पावधीतच श्री. झाबक यांनी प्रचारात जोरदार मुसंडी मारली आहे. हल्ली श्री. झाबक यांनी निर्माण केलेल्या हवेची मोठी चर्चा आहे. विशेष म्हणजे श्री. झाबक यांचे मित्र व समर्थक त्यांच्यासाठी स्वेच्छेने सर्वत्र प्रभावी प्रचार करीत आहेत.

श्री. झाबक अरिहंत फर्निचरचे मालक आहेत. त्यांच्या शो रूमवर शहरातील सर्वच चर्चित चेहरे नेहमीच पहावयास मिळतात. सर्वांना हवे-हवेसे वाटणारे व कोणाशीही कोणत्याही स्वरूपाचे वैर नसलेले श्री. झाबक खा. शि. मंडळाच्या निवडणुकीत जलवा करीत आहेत.

# राजकीय विश्वात कधीही न दिसलेल्या प्रसंगांमुळे वातावरण निघाले ढवळून

## अमळनेकरांनी पदोपदी व क्षणोक्षणी अनुभवली उत्कंठा, जल्लोष अन् हिरमोड...!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथे आतापर्यंत पालिका निवडणुकीच्या मतदानाच्या दुसऱ्याच दिवशी नेहमीच मतमोजणी अर्थात निकाल जाहीर होत होता. मात्र, एका प्रभागाच्या न्यायप्रविष्ठतेमुळे येथील पालिका निवडणुकीसाठी झालेल्या मतदानानंतर मतमोजणीसाठी तब्बल १८ दिवस प्रतिक्षा करावी लागली. हे १८ दिवस कार्यकर्त्यांसाठी उत्कंठेचे होते, तर उमेदवार आणि त्यांचा परिवार यांच्यासाठी अक्षरशः जीवघेणे ठरले. त्यांना या १८ दिवसात अन्नपाणी गोड लागले नाही. कशातच चित्त लागले नाही. कोणत्याही गोष्टीचा मनमोकळा आनंद उपभोगता आला नाही. या पार्श्वभुमीवर रविवार, दि. २१ डिसेंबर रोजीची मतमोजणी म्हणजे उत्कंठेची पाराकाष्टा होती असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

मतमोजणीप्रसंगी प्रत्येक फेरीच्या शेवटी उमेदवारांचा व त्यांच्या निकटवर्तीयांचा निश्चितपणे बीपी वेगाने खाली-


पान २ वर
















# आई गेली, पण संघर्षाने स्वप्न साकार केले!

**सक्सेस स्टोरी**

## आयएसएस रूपल राणाची यूपीएससी परीक्षेतील यशोगाथा मनाला भिडते



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

उत्तर प्रदेशातील रूपल राणा यांनी यूपीएससी परीक्षेत २६ वी रँक मिळवून आयएएस अधिकारी बनण्याचे स्वप्न पूर्ण केले. लहानपणीच आईचे छत्र हरपले, तरी वडिलांच्या पाठिंब्याने आणि अथक परिश्रमाने त्यांनी हे यश मिळविले. पहिल्या दोन प्रयत्नांतील अपयशानंतरही हार न मानता तिसऱ्या प्रयत्नात मिळविलेले हे यश लाखो तरुणांसाठी प्रेरणादायी आहे.

### पार्श्वभूमी आणि शिक्षण

रूपल राणा उत्तर प्रदेशातील बागपत जिल्ह्यातील रहिवासी आहेत. त्यांनी सुरूवातीचे शिक्षण जेपी पब्लिक स्कूल, बागपत येथे पूर्ण केले. दहावीत उत्कृष्ट कामगिरी केल्यानंतर त्यांनी पिलानी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधून अकरावी आणि बारावी पूर्ण केली. उच्च शिक्षणासाठी दिल्ली विद्यापीठातील देशबंधू कॉलेजमध्ये प्रवेश घेतला आणि पदवी घेताना विद्यापीठाच्या टॉपर ठरल्या.

### आईचे निधन आणि कुटुंबाचा आधार

रूपल यांनी अगदी लहान वयात आई गमावली. हा आयुष्यातील मोठा आघात होता. त्यांनी खचून न जाता पुढे जाण्याचा निर्धार केला. वडील जसवीर राणा (दिल्ली पोलिसांत सहाय्यक उपनिरीक्षक) आणि भावंडांनी नेहमी प्रोत्साहन दिले. कुटुंबाच्या सहकार्याने आणि स्वतःच्या दृढ इच्छाशक्तीने त्यांनी शिक्षण सुरू ठेवले.

### यूपीएससी प्रवास : अपयश ते विजय

यूपीएससी परीक्षेत अपयश ही सामान्य गोष्ट आहे. रूपल यांनाही पहिल्या दोन प्रयत्नांत यश मिळाले नाही. मात्र, हार न मानता अधिक मेहनत केली. तिसऱ्या प्रयत्नात २६ वी रँक मिळवून त्यांनी आयएएस बनण्याचे स्वप्न साकार केले. योग्य रणनीती, कठोर परिश्रम आणि आत्मविश्वासाने कोणतेही ध्येय गाठता येते, हे त्यांच्या यशाने सिद्ध होते.

### प्रेरणा आणि संदेश

रूपल राणा यांची कहाणी कठीण परिस्थितीवर मात करू इच्छिणाऱ्या प्रत्येक तरुणासाठी मार्गदर्शक आहे. दृढनिश्चय आणि चिकाटीने यश नक्की मिळते, हा त्यांचा संदेश आहे.

# रात्री झोपण्याआधी लसणाच्या ५ पाकळ्या दुधात उकळवून नक्की प्या

## सकाळी परिणाम पाहून थक्क व्हाल, डॉक्टरांनी स्वतः दिली माहिती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



जर तुम्ही दम्याच्या सुरूवातीच्या टप्प्यात असाल, तर डॉक्टरांना भेटणे आणि काही घरगुती उपाय करून पाहणे यामुळे हा आजार टाळण्यास मदत होऊ शकते.

दमा ही अशी स्थिती आहे, ज्यामध्ये एखाद्या व्यक्तीच्या श्वसनमार्गांना सूज येते. ज्यामुळे जास्त कफ निर्माण होतो. ज्यामुळे श्वास घेण्यास त्रास होतो आणि सतत खोकला येतो. या आजाराबद्दल जागरूकता निर्माण होणे गरजेचे आहे. दमा हा श्वसनमार्ग आणि फुफ्फुसांशी संबंधित एक गंभीर आजार आहे. ज्यामध्ये वेळेवर उपचार न मिळाल्यास कधी-कधी रुग्णाचा मृत्यूदेखील होऊ शकतो. दमा रोखण्यासाठी काही सामान्य बाबी समजून घेणे महत्त्वाचे आहे. दमा हा एक दीर्घकालीन दाहक आजार आहे. जो फुफ्फुसांच्या वायुमार्गांवर दुष्परिणाम करतो. त्यामुळे खोकला, श्वास घेण्यास त्रास होणे, घरघर होणे व छातीत घट्टपणा येणे ही लक्षणे जाणवतात.

**लसूण :** लसूण खाणे केवळ दम्यासाठीच नाही, तर प्रत्येक आजारासाठी फायदेशीर आहे. दम्यावरील उपचारासाठी लसणाच्या पाच पाकळ्या ३० मि.ली. दुधात उकळा आणि दररोज त्याचे सेवन करा. स्वयंपाकाची चव वाढावी, यासाठी फोडणीमध्ये लसणाचाही वापर केला जातो. लसणामुळे अन्नपदार्थ चविष्ट होण्यास मदत मिळते. लसणामधील औषधी गुणधर्मामुळे आपल्याला भरपूर आरोग्यदायी फायदे मिळतात. त्यातील पोषक घटकांमुळे कित्येक आजारांपासून आपले संरक्षण होण्यास मदत मिळते. आयुर्वेदामध्ये लसूण हे एक औषध म्हणून ओळखले जाते. लसणाचा उग्र वास अनेकांना आवडत नाही. त्यामुळे लसूण खाणे टाळले जाते. पण कमी प्रमाणात का होईना आरोग्यासाठी दररोज लसूण खाणे उत्तम असते.

**ओवा :** दम्याच्या उपचारात ओवा खूप फायदेशीर आहे. त्यासाठी ओवा पाण्यात टाका, उकळवा आणि त्याची वाफ घ्या. त्यामुळे श्वासोच्छ्वासाच्या समस्या दूर होतात.

**अंजीर :** दम्यावरील उपचारासाठी, वाळलेले अंजीर रात्रभर कोमट पाण्यात भिजवून ठेवा आणि सकाळी रिकाम्या पोटी ते खा. अंजीर कफ जमा होण्याला रोखतो. कफ सैल होण्यासाठी आणि श्वसनमार्गातून त्याला बाहेर काढण्यासाठी अंजीर खूप उपयुक्त आहे. त्यामुळे संसर्गाचा धोका कमी होतो.

**मेथी :** आयुर्वेदानुसार मेथीचे दाणे हा दम्याच्या उपचारासाठी एक रामबाण उपाय आहे. एक ग्लासभर पाण्यात काही मेथीचे दाणे टाकून, ते पाणी उकळा. एक तृतीयांश पाणी कमी झाल्यावर ते मेथीचे दाणेमिश्रित पाणी कोमट झाल्यावर मध व आल्याचा रस घाला आणि दररोज सकाळी व संध्याकाळी त्याचे सेवन करा. दरम्यान, ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (एम्स)च्या संचालकांच्या मते, " इनहेल्ड कॉर्टिकोस्टेरॉईड थेरपी हा दमा नियंत्रित करण्यासाठी सर्वांत प्रभावी उपचार आहे." त्यांच्या मते, "दमा हा एक जुनाट आजार आहे. ज्यासाठी दीर्घकालीन उपचारांची आवश्यकता असते. बरेच रुग्ण बरे वाटल्यावर केले जाणारे उपचार थांबवतात. ही बाब धोकादायक ठरू शकते. कारण तुम्ही तंदुरुस्त आणि निरोगी करणाऱ्या उपचार सोडून देत आहात. रुग्णांनी त्यांचे उपचार बंद करण्यापूर्वी त्यांच्या डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. स्वतःहून इनहेलरचा वापर करणे धोकादायक ठरू शकते."

रोज सकाळी उपाशीपोटी खा लसूण, फायदे पाहून व्हाल थक्क!

### कर्करोगापासून बचाव

लसणात अँटी ऑक्सिडंट्स, अँटी-इंफ्लेमेटरी व अँटी-कार्सिनोजेनिक गुणधर्म असतात. त्यामुळे सकाळी काहीही न खाता लसणाच्या पाकळ्या खाल्ल्यास कर्करोगाचा धोका बऱ्याच प्रमाणात कमी होतो.

### वजन नियंत्रणात राहण्यास मदत

तुम्हाला जर तुमचे वजन नियंत्रणात ठेवायचे असेल, तर तुम्ही दररोज लसणाच्या काही पाकळ्या खाल्ल्या पाहिजेत. कारण लसणात काही असे घटक असतात, जे शरीरातील अतिरिक्त चरबी कमी करतात. त्यामुळे दररोज लसणाच्या पाकळ्या खाव्यात.

# बिना थके १२ घंटे की पढ़ाई कैसे करें?

## फिजिक्स वाला अलख पांडे ने बताया टिप्स

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

फिजिक्स वाला के सीईओ अलख पांडे कहते हैं कि बिना थके हुए १२ घंटे की पढ़ाई करने के लिए सही टाइम टेबल बहुत जरूरी है। इसके लिए अलख सर ने कुछ टिप्स बताए हैं।

### सुबह ६ से साढ़े ६ के बीच उठ जाएं

अलख सर कहते हैं कि १२ घंटे की पढ़ाई करने के लिए सुबह ६ से साढ़े ६ तक उठना जरूरी है। सुबह का दिमाग ३ गुना तेज चलता है। सुबह जल्दी जगने के लिए रात में ११ बजे तक सो जाएं।

### ४ स्लॉट में दिन को बांटे

फिजिक्स वाला के नाम से मशहूर अलख सर कहते हैं कि ४ घंटे का ४ स्लॉट तैयार करें। सुबह ७ से ११, ११ से ३ बजे, ३ से ७ बजे, ७ बजे से ११ बजे।

### सुबह का गोल्डन टाइम

सुबह ६:३० बजे तक जगने के बाद जॉगिंग और एक्सरसाइज करें और नाश्ता करने के बाद ७ से ७.३० तक पढ़ने बैठ जाएं। इसके बाद ३.५ घंटे फुल फोकस स्टडी करें।

### दोपहर का पावर सेशन

११-१२ बजे तक १ घंटे का रेस्ट लें और इसके बाद १२ से ३ बजे तक ३ घंटे पढ़ाई करें। इस स्लॉट में ही लंच और आराम करने के लिए ब्रेक ले लें।

### शाम का सेकंड गियर

३ से ४ बजे के बीच में १ घंटे का ब्रेक लेकर चाय और वाकिंग कर खुद को रिफ्रेश कर लीजिए। इसके बाद ४ बजे से ७ बजे तक ३ घंटे की पढ़ाई कीजिए।

### नाइट का फिनिशिंग टच

७ से ८ बजे का ब्रेक लेकर डिनर और फैमिली के साथ थोड़ा टाइम बिताएं। इसे बाद ८ से ११ बजे तक ३ घंटे की पढ़ाई करें। अलख सर कहते हैं रात में रिवीजन और पीवायक्यू करने से सब कुछ याद हो जाएगा।



### थकान भगाने के लिए पानी और स्नैक्स

अलख सर कहते हैं कि हर १ घंटे में १ गिलास पानी पीएं और कुछ हेल्दी सैक्स लें। इससे आपको एकदम थकान महसूस नहीं होगी।

### फोन से बनाएं दूरी

पढ़ाई के समय फोन दूसरी रूम में रखें या उसे पूरी तर से लॉक कर दें। १२ घंटे का टाइम टेबल फॉलो करने के लिए आपको डिसिप्लिन रहना बहुत जरूरी है।

### अलख सर का फाइनल मंत्र

अलख सर कहते हैं कि १२ घंटे वाले पढ़ाई का टाइम टेबल केवल ३० दिन फॉलो करके देखें, आपको फर्क खुद महसूस होने लगेगा।


## आजचे अभीष्टचिंतन



**दिव्या भोसले**
राष्ट्रीय महासचिव, व्हॉईस ऑफ मीडिया



**श्री. मनोज पाटील**
माजी नगरसेवक, अमळनेर



**श्री. राजेंद्र जैन**
अनुपम इलेक्ट्रॉनिक्स, अमळनेर



**श्री. दिनेश शिसोदे**
सामाजिक कार्यकर्ता

# राजकीय विश्वात कधीही न दिसलेल्या प्रसंगांमुळे वातावरण निघाले ढवळून

**पान १ वरून**

वर होत होता. मात्र, ज्या उमेदवारांची आघाडी वाढत होती त्यांचे समर्थक व कार्यकर्ते जल्लोष करत होते. मात्र, आघाडीत उलटफेर होऊन विजयी होणारा उमेदवार जेव्हा पराभूत होत होता तेव्हा जल्लोष करणारे कार्यकर्ते व उमेदवार आणि त्याचे निकटवर्तीय यांचे चेहरे आणि त्यांच्या दुःखद भाव-भावनांचे वर्णन शब्दात होऊ शकत नाही. खिन्न आणि सुन्न मनाने त्यांचे इंदिरा भुवनपासून परतणे पाहावले जात नव्हते. त्याचवेळी आकस्मिक यश प्राप्ती झाल्यानंतर उमेदवार व त्यांच्या समर्थकांचा तुफानी जल्लोष अवर्णनिय राहिला. विशेष म्हणजे काही उमेदवारांना विजयी घोषीत करण्यात आले. मात्र, पराभूत उमेदवारांच्या मागणीने झालेल्या रिकाऊंटींगमुळे बदललेला निकाल त्यामुळे विजयी आणि पराभूत उमेदवार आणि त्यांचे समर्थक यांचे बदललेले चेहरे सर्वांच्याच लक्षात राहतील. आनंद आणि दुःखाचा तडकाफडकी झालेला लपंडाव अवर्णनीय राहिला. काही प्रभागातील दिग्गज उमेदवारांचा मोठ्या फरकाने झालेला पराभव तसेच काहींचा निसटता विजय आणि पराभव याप्रसंगी मतमोजणीस्थळी जे काही घडत होते ते अवर्णनिय आहे. ज्यांनी हे सारे दृश्य प्रत्यक्ष पाहिले ते आयुष्यभर विसरू शकत नाहीत. नगराध्यक्षपदी शविआचे जितेंद्र ठाकूर हमखास विजयी होतील असे वातावरण होते. मात्र, सुमारे ८० टक्के राजकीय सट्टेबाजांनी शिवसेनेचे डॉ. परीक्षित बाविस्कर यांना पसंती दिली होती. त्यांना मोठा आर्थिक लाभ झाल्याची, तर २० टक्के सट्टेबाजांनी श्री. ठाकूर यांना पसंती दिली होती. त्यांना आर्थिक फटका बसल्याची चर्चा आहे. अनेक दिग्गजांना बसलेला पराभवाचा फटका, राजकीय विश्लेषकांचे चुकलेले अंदाज यामुळे येथील राजकीय वातावरण पूर्णतः ढवळून निघाले आहे.

श्री. ठाकूर यांच्या विजयाची त्यांच्या निकटवर्तीयांना खूप आत्मविश्वासपूर्वक खात्री असल्याने त्यांनी निकाल जाहीर होण्यापूर्वीच त्यांच्या अभिनंदनाचे मोठ-मोठे डिजिटल बॅनर शहरात लावले होते. प्रारंभी श्री. ठाकूर यांनी मताधिक्यही घेतले होते. त्यामुळे त्यांच्या समर्थकांमध्ये जल्लोषाचे वातावरण होते. मात्र, मतांच्या आघाडीत मोठा उलटफेर झाल्याबरोबर श्री. ठाकूर यांचे कार्यकर्ते व निकटवर्तीय यांनी इंदिरा भुवनमधून बाहेर पडण्यास प्रारंभ केला. तर शिवसेनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने इंदिरा भुवन व शिरिषदादा चौधरी यांच्या कार्यालयासमोर जमू लागले. दरम्यान, श्री. ठाकूर यांच्या अभिनंदनाचे बॅनर्स त्यांच्या समर्थकांनी काढून घेतले. असा दूर्दैवी प्रसंग येथील राजकीय विश्वात प्रथमच झाला आहे. श्री. ठाकूर यांनी आरक्षण जाहीर झाल्यापासून प्रचंड मेहनत घेतली होती. त्यांच्यासाठी आमदार अनिलदादा पाटील व त्यांच्या संपूर्ण यंत्रणेनेही कोणतीच कसर शिल्लक ठेवली नव्हती. त्या तुलनेने डॉ. बाविस्कर नवखे उमेदवार होते. त्यांना प्रचारासाठीही खूप कमी वेळ मिळाला. शविआच्या तुलनेने शिवसेनेची यंत्रणाही कमजोर होती. तरीही डॉ. बाविस्कर मोठ्या मताधिक्याने विजयी झाल्याने शिवसेना व माजी आमदार शिरीषदादा चौधरी तसेच त्यांचे कार्यकर्ते यांनी जोरदार जल्लोष केला.

दरम्यान, डॉ. बाविस्कर यांचा विजय घोषित होताच त्यांची अत्यंत जल्लोषपूर्ण विजयी मिरवणूक काढण्यात आली. डॉ. बाविस्कर यांनी सुरूवातीला साने गुरुजींच्या पुतळ्यास माल्यार्पण केले. त्यानंतर शहरातील विविध भागात त्यांची विजयी मिरवणूक काढण्यात आली. तसेच अनेक विजयी उमेदवारांनीही आपापल्या प्रभागांत विजयाचा जल्लोष केला. शहरात सर्वत्र गुलालाचे ढिग व फटाक्यांचे अवशेष दिसत होते.



# मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे मोफत मोतिबिंदू तपासणी शिबिर

## २१० रुग्णांची तपासणी; ९५ रुग्ण शस्त्रक्रियेस पात्र ठरल्याने पनवेलला रवाना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मंगळ ग्रह सेवा संस्था, ना. गुलाबरावजी पाटील सोशल फाउंडेशन (पाळधी), संकल्प सेवा फाउंडेशन (धनवाडी) व आर. झुणझुणवाला शंकरा आय हॉस्पिटल (पनवेल) यांच्यातर्फे रविवार, दि. २१ डिसेंबर रोजी मंगळ ग्रह मंदिरात मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिर झाले. या शिबिराचा २१० रुग्णांनी लाभ घेतला. त्यापैकी ९५ रुग्ण मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरले आहेत. त्यांना दुपारी मंगळग्रह मंदिर येथून आर. झुणझुणवाला शंकरा आय हॉस्पिटल (पनवेल) येथे शस्त्रक्रियेसाठी रवाना करण्यात आले. या शिबिरात अमळनेर, धुळे, चोपडा, जळगाव, एरंडोलसह तालुक्यातील ग्रामीण भागातील रूग्णांचा सहभाग होता. डॉ. राहुल चौधरी, डॉ. गौरव तायडे, डॉ. विजय बामणे (नेत्ररोग तज्ज्ञ, शंकरा आय हॉस्पिटल, पनवेल) यांनी तपासणी केली.

मंगळ ग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष एस. एन. पाटील, खजिनदार गिरीश कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी आर. जी चव्हाण उपस्थित होते. कॅम्पचे मुख्य संयोजक असद अन्वर, हर्षाली शिंदे, प्राजक्ता गायकवाड, सागर पाटील, रोहन कोळी, सेवेकरी भूषण पाटील, मयूर चौधरी, गणेश शिंपी प्रमोद आर्दीनी सहकार्य केले. मंगळ ग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांनी सर्व रुग्णांशी हितगूज केले. श्री. विनोद कदम सर यांनी मंदिराचा ध्वज दाखवून सर्वांना निरोप दिला.



दरम्यान, सदर शिबिर दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी श्री मंगळ ग्रह मंदिर येथे नियमितपणे होते, याचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे मंगळ ग्रह सेवा संस्थेतर्फे आवाहन करण्यात आले आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# अमळनेर पालिका निवडणूक-२०२५ प्रभागनिहाय निकाल

### प्रभाग १ (अ)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) कविता विजय राजपूत | शविआ | १,३५० |
| २) सरिता भरत पवार (पाटील) | शिवसेना (शिंदे गट) | १,१६९ |
| ३) शालिनी श्याम कदम | अपक्ष | ९१७ |

### प्रभाग २ (अ)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) देवेंद्र भानुदास कांबळे | शविआ | १,४८८ |
| २) माया कैलास लोहारे | शिवसेना (शिंदे गट) | ७३५ |
| ३) शारदा नारायण नवालाल | मविआ | ९५ |
| ४) संदीप बबनराव सैंदाणे (भैय्या) | अपक्ष | २२३ |
| ५) अरुण ओंकार संदानशिव | अपक्ष | ४८६ |

### प्रभाग ३ (अ)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) शोभाबाई भिवसन गढरे | शविआ | १,४१३ |
| २) पूजा रमेश शिंदे (पूजा सिंधी) | शिवसेना (शिंदे गट) | १,०२० |
| ३) सखूबाई अमृतलाल भिल | मविआ | ११७ |
| ४) मीनाबाई शंकर सोनवणे | अपक्ष | १८४ |

### प्रभाग १ (ब)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) कैलास नामदेव पाटील | अपक्ष | १,३४६ |
| २) नरेंद्र विष्णू चौधरी (नरूभाऊ) | शाविआ | ९१३ |
| ३) राजेंद्र श्याम यादव | शिवसेना (शिंदे गट) | ७७५ |
| ४) गुलाम कादर पिंजारी | अपक्ष | ५०४ |
| ५) इम्रान शब्बीर पठाण | मविआ | ७६ |

### प्रभाग २ (ब)



| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) अफसाना मुख्तार खाटीक | शविआ | १,६३३ |
| २) गायत्री प्रवीण पाटील | शिवसेना (शिंदे गट) | ७२५ |
| ३) भारती संतोष पाटील | अपक्ष | ६५० |
| ४) खैरुन्निसा रेह्मनतुल्ला पिंजारी | अपक्ष | २६ |

### प्रभाग ३ (ब)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) भरतकुमार सुरेश ललवाणी | शविआ | १,२८० |
| २) श्रीकृष्ण रामसिंग बहारे (किरणभाऊ) | शिवसेना (शिंदे गट) | ८५७ |
| ३)बबिता महेंद्र ताजणे | अपक्ष | ५८३ |
| ४) महेंद्र नाना साळुंके | अपक्ष | ३६ |

### प्रभाग ४ (अ)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) नंदा नरेंद्र संदानशिव | शविआ | १,९०० |
| २) नीता रमेश कांबळे | शिवसेना (शिंदेगट) | ४०३ |
| ३) छाया अरविंद बिऱ्हाडे | अपक्ष | ३०९ |
| ४) सुनंदा सुरेश मोरे | मविआ | १७२ |
| ५) शेख आयशा बी.शेख अलतापराजा | अपक्ष | ४९१ |
| ६) जिजाबाई सोमचंद संदानशिव | अपक्ष | १४८ |

### प्रभाग ५ (अ)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) श्रीराम भगवान चौधरी (आबा) | शिवसेना (शिंदे गट) | १,४५४ |
| २) हेमंत भास्करराव पवार | शविआ | ७८९ |
| ३) चेतन नारायण जाधव | अपक्ष | १२९ |
| ४) शाहरुख आसिफ खाटीक | अपक्ष | १,०६२ |

### प्रभाग ६ (अ)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) सविता योगराज संदानशिव | अपक्ष | २,०७४ |
| २) प्रतिभाताई सुधाकर गजरे | अपक्ष | ६९ |
| ३) डॉ.हर्षल देवदत्त संदानशिव | शविआ | १,१७५ |

### प्रभाग ४ (ब)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) शेख नावीद अहमद मुशिरोद्दीन | शिवसेना (शिंदे गट) | १,४९१ |
| २) इब्राहिम हबीब खाटीक (इम्रान) | शविआ | १,२२८ |
| ३) परेश रवींद्र उदेवाल | अपक्ष | २१५ |
| ४) दिनेश अनिल खरारे | अपक्ष | १३० |
| ५) ॲड. अभिजित प्रकाश बिऱ्हाडे | अपक्ष | ९९ |
| ६) दिनेश शिवदास बिऱ्हाडे | अपक्ष | २३६ |

### प्रभाग ५ (ब)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) कल्पना भरतसिंग परदेशी | अपक्ष | १,३९२ |
| २) मिसबाह मनाजीरअली सय्यद | शिवसेना (शिंदे गट) | ८८७ |
| ३) शेख शबनूर बी. सलीम | शविआ | ११४७ |

### प्रभाग ६ (ब)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) दीपक हरी चौगुले | अपक्ष | १,९२६ |
| २) मनोज भाऊराव पाटील (मनोजबापू) | अपक्ष | १,३४८ |
| ३) अश्विनी गोरख पाटील | शाविआ | ४० |

### प्रभाग ७ (अ)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) प्रा.योगीता सयाजीराव कापडणेकर | अपक्ष | १,२४१ |
| २) रेखा संजय पाटील | शविआ | ६९२ |
| ३) प्रा.डॉ.नयना कैलास पाटील | शिवसेना (शिंदे गट) | ९९३ |

### प्रभाग ८ (अ)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) सचिन बळवंत पाटील | शविआ | बिनविरोध |

### प्रभाग ९ (अ)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) कल्पना चंद्रकांत शर्मा | शिवसेना (शिंदे गट) | १,३३१ |
| २) मयूरी पंकज साळी | शविआ | १,२६४ |
| ३) सपना बापू चौधरी (राजू बापू) | अपक्ष | ३२९ |
| ४) पुष्पा राजेंद्र अग्रवाल | अपक्ष | १०८ |

### प्रभाग ७ (ब)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) प्रवीण गंगाराम पाटील | अपक्ष | १,३३२ |
| २) श्याम जयवंतराव पाटील | शविआ | १०३२ |
| ३) अविनाश दगडू जाधव | शिवसेना (शिंदे गट) | ५५९ |

### प्रभाग ८ (ब)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) अपूर्वा जालंधर चौधरी (पाटील) | शिवसेना (शिंदे गट) | १,४५४ |
| २) ॲड.चेतना यज्ञेश्वर पाटील | शाविआ | १०५४ |

### प्रभाग ९ (ब)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) पंकज पंडित चौधरी | शिवसेना (शिंदे गट) | १,५३७ |
| २) चेतन देवसिंग राजपूत | शविआ | १४८८ |

### प्रभाग १० (अ)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) सचिन विभाकर कासार | शविआ | १,४७७ |
| २) कैलास रामलाल भावसार | शिवसेना (शिंदे गट) | ११०१ |
| ३) श्यामकांत देविदास चौधरी | अपक्ष | ४२१ |
| ४) विजय धनराज पाटील | अपक्ष | १०९४ |

### प्रभाग ११ (अ)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) छाया बाळू पाटील | अपक्ष | १,७३७ |
| २) शारदा संजय पाटील | शिवसेना (शिंदे गट) | १४१६ |

### प्रभाग १२ (अ)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) पुष्पा पंकज भोई (मोरे) | शिवसेना (शिंदे गट) | १,५८६ |
| २) योगिता विजय पाटील | शविआ | १५०५ |

### प्रभाग १० (ब)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) स्वाती सूरजसिंग परदेशी | अपक्ष | १,१८२ |
| २) भाग्यश्री दीपक पाटील | शिवसेना (शिंदे गट) | ४३९ |
| ३) हर्षदा कमलेश गुरव | अपक्ष | ४४४ |
| ४) सुवर्णा चंद्रकांत चौधरी | अपक्ष | ११३२ |
| ५) मनीषा संजय मराठे | शविआ | ८९९ |

### प्रभाग ११ (ब)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) विजय कहारू पाटील | शविआ | २१७६ |
| २) सुरेश आत्माराम पाटील | अपक्ष | ९६२ |

### प्रभाग १२ (ब)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) सुयोग ज्ञानेश्वर धनगर | शिवसेना (शिंदे गट) | १,६१८ |
| २) प्रताप छबूलाल साळी | शविआ | ८०३ |
| ३) संदीप बापू भोई (खलीबाबा) | अपक्ष | ३२ |
| ४) सुदाम जगन्नाथ शिंगाणे | अपक्ष | ६९७ |

### प्रभाग १३ (अ)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) जुबेदाबी नसिरोद्दीन शेख | शविआ | १,८९८ |
| २) उज्वला देविदास महाजन | शिवसेना (शिंदे गट) | १,५५३ |
| ३) वैशाली संजय महाजन | मविआ | १३३ |
| ४) भारती रमाकांत माळी | अपक्ष | ७०१ |
| ५) नसरीनबी युनुस शेख | अपक्ष | ३८ |

### प्रभाग १४ (अ)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) सुवर्णा तुळशिराम हटकर | अपक्ष | १,२८५ |
| २) गीताबाई गणेश पाटील | शविआ | ७९८ |
| ३) अनिता गणेश वैद्य | मविआ | १६३ |
| ४) ज्योती पंकज शेटे | शिवसेना (शिंदे गट) | ४८७ |

### प्रभाग १५ (अ)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) प्रशांत म. निकम | मविआ | १,१४० |
| २) विनोद मधुकर कदम | शविआ | ६८६ |
| ३) सुनील चंद्रकांत भामरे | शिवसेना (शिंदे गट) | ३०८ |

### प्रभाग १३ (ब)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) अनिल गंगाराम महाजन | शिवसेना (शिंदे गट) | १,६६६ |
| २) प्रवीण बारकू महाजन | शविआ | ७६६ |
| ३) आलीदखाँ इस्माईलखाँ पठाण | मविआ | ४८ |
| ४) सुनील दयाराम महाजन | अपक्ष | ६६ |
| ५) अब्दुल कादर शेख इब्राहिम | अपक्ष | ३८६ |
| ६) सलीम फत्तू शेख (शेखा मिस्तरी) | अपक्ष | १३८७ |
| ७) परमेश्वर वासुदेव सैंदाणे | अपक्ष | २१ |

### प्रभाग १४ (ब)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) प्रा.रामकृष्ण बापूराव पाटील | अपक्ष | ९२३ |
| २) प्रवीणकुमार शशिकांत पाठक | शिवसेना (शिंदे गट) | ६२७ |
| ३) जयपाल सुरेश देसले | अपक्ष | ३६१ |
| ४) निलेश उत्तम महाजन | शविआ | ८१७ |

### प्रभाग १५ (ब)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) जयश्री अनिल पाटील | शविआ | १,३३७ |
| २) मनीषा दीपक पाटील | शिवसेना (शिंदे गट) | ७२१ |
| ३) रंजना संजय पाटील | अपक्ष | २९ |

### प्रभाग १६ (अ)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) महेश प्रभाकर देशमुख | अपक्ष | १,२५९ |
| २) राजेश शिवाजीराव पाटील (बापू) | शविआ | १,०२६ |
| ३) दीपक देविदास चौधरी | शिवसेना (शिंदे गट) | ४०८ |

### प्रभाग १७ (अ)



| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) स्वप्ना विक्रांत पाटील | शविआ | १९१५ |
| २) सोनाली प्रमोद घोटकर | अपक्ष | १३९ |
| ३) भावना कैलास विसपुते | अपक्ष | १२२७ |

### प्रभाग १८ (अ)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) इर्शाद सुनील तडवी | शिवसेना (शिंदे गट) | १,३५७ |
| २) गणेश आनंद पवार | शविआ | ९१६ |
| ३) योगेश विलास बाविस्कर | अपक्ष | ७५२ |
| ४) भूषण मनोहर साळुंखे | अपक्ष | ६४७ |

### प्रभाग १६ (ब)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) नीलिमा विश्वनाथ पाटील | अपक्ष | १,५८२ |
| २) विद्या संजय भदाणे | शविआ | १,०८० |

### प्रभाग १७ (ब)


| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) साहेबराव वसंत पवार (दादा पवार) | शिवसेना (शिंदे गट) | १२८६ |
| २) प्रताप अशोक शिंपी | शविआ | ८८७ |
| ३) रंजित भीमसिंग पाटील | अपक्ष | ११३३ |

### प्रभाग १८ (ब)



| नाव | पक्ष | मते |
|---|---|---|
| १) रुपाली विलास शिवदे | अपक्ष | १,९६२ |
| २) आशा सुरेश महाजन | शिवसेना (शिंदे गट) | ३४३ |
| ३) शशिकला सुभाष महाजन | अपक्ष | ५८८ |
| ४) अनिता विनोद लांबोळे | शविआ | ८२५ |




# सत्संगाचा महिमा अपार!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

खूप जुनी गोष्ट आहे. गुलीक नावाचा एक दरोडेखोर होता. तो नेहमी दुसऱ्याचे धन कसे हिसकावता येईल, याचीच संधी शोधायचा. दुष्ट प्रवृत्तीचा असल्यामुळे त्याच्या हृदयात थोडीही दया नव्हती. तो धनाच्या लालसेने खून करण्यास थोडाही भीत नव्हता. परस्त्रीचे अपहरण करणे, पशू-पक्ष्यांची हत्या करणे, धनासाठी ब्राह्मणांची हत्या करणे, देवाची संपत्ती हडप करणे हाच त्याच्या जीवनाचा उद्देश होता. कोणतेही पाप, कर्म, करताना त्याला काहीच वाटत नसे. याच पापाच्या कमाईवर तो आपले स्वतःचे आणि परिवाराचे पोट भरत असे. एके दिवशी धनाच्या शोधात तो जंगलात पोहोचला. तेथे त्याने सोन्याच्या कळसाने सुसज्जित एक मंदिर पाहिले. गुलीकने तो कळस चोरण्याच्या हेतूने त्या मंदिरात प्रवेश केला. त्याच्या मनात पापाने जन्म घेतला आणि तो मंदिरात चोरी करण्यासाठीही तयार झाला. तेव्हा त्याची नजर एका ब्राह्मणावर पडली. त्या ब्राह्मणाचे मुखमंडल तपाच्या तेजाने चमकत होते. ज्ञान आणि प्रकाशाची आभा ब्राह्मणाच्या मुखमंडलावर स्पष्ट दिसत होती. तो नेहमी लोकांची



सेवा आणि देवाची पूजा-अर्चा करत असे. त्याचे हृदय दयेने भरलेले होते. तो नेहमी लोकांना ज्ञानाचा उपदेश देत असे. त्याचे नाव उत्तक होते.

गुलीकने विचार केला, की हा ब्राह्मण मला चोरी करू देणार नाही. त्यामुळे त्याला रस्त्यातून बाजूला करणेच योग्य होईल, असा निश्चय करून त्याने आपली तलवार काढली आणि त्या ब्राह्मणावर आक्रमण केले. त्याने ब्राह्मणाच्या जटा पकडून त्याला जमिनीवर पाडले आणि छातीवर पाय ठेवून मारणार तोच ब्राह्मण म्हणाला, ''माणूस जोपर्यंत धन कमावतो तोपर्यंतच त्याचे भाऊबंध त्याच्याशी संबंध ठेवतात; परंतु परलोकांत जाताना त्याचा धर्म आणि अधर्मच सोबत जातो.''

सत्संगाची महिमा खूप मोठी असते. ब्राह्मणाचे बोलणे ऐकताच गुलीकचे हात थांबले. ज्या प्रकारे परिस लोखंडाचे सोने करतो, त्याचप्रमाणे सत्संग दुष्ट माणसालाही निर्मळ बनवतो. देवाच्या कृपेने सत्संग आणि संतांचे दर्शन लाभते. दुष्ट लोक फक्त सत्संगाच्या माध्यमातूनच सुधरू शकतात.

गुलीकला शांत पाहून ब्राह्मण पुन्हा म्हणाला, ''बघ बंधू, यावेळी मी देवाच्या चरणी आहे. मी तुझे काहीच वाईट केले नाही आणि कोणताच गुन्हाही केला नाही. मग तू मला का मारू इच्छितो? तू सर्वांचा पालक असलेल्या देवाला शरण जा. तो तुला माफ करील.''

जो पापी आणि अपराधी माणसालाही मारणार नाही तोच शक्तिशाली असतो. जो त्रास देणाऱ्यालाही माफ करील तोच माणूस सज्जन असतो. दुसऱ्याचे भले करणारा माणूस कुणाचाही हेवा करत नाही. अशा माणसावर देवाची खूप कृपा असते.

''हे दुष्टा, तू लुटीच्या धनाने आपल्या कुटुंबाचे पालनपोषन करतोस; पण मृत्यूनंतर तुझे सगेसायरे, भाऊ-बहीण, आई-वडील, मुलं-मुली सगळे याच पृथ्वीवर राहतील आणि तू एकटाच नरकयातना भोगशील. पापाने कमविलेल्या धनाचा सगळे उपभोग घेतात; परंतु पापात त्यांचा वाटा नसतो. त्यामुळे तू पापी कामे करणे सोडून दे. ब्राह्मणाचे बोलणे ऐकून गुलीकच्या बुद्धीवर असा प्रभाव पडला की, तो त्या महर्षींच्या पायावर पडून क्षमायाचना करू लागला आणि त्यांच्या चरणीच त्याने प्राण त्यागले.

गुलीकचे मृत शरीर पाहून ब्राह्मणाचे हृदय करुणेने भरले. त्यांनी दुःखी अंतःकरणाने देवाच्या पायाजवळील पाणी मृत गुलीकच्या अंगावर शिंपडले. त्यामुळे त्याचे सगळे पाप नष्ट झाले. गुलीकने निष्पाप होऊन आपल्या दिव्य शरीरातून महर्षी उत्तकावर पुष्पवृष्टी केली आणि त्यांचे गुण गाण गात विष्णुधामाला निघून गेला.
जो माणूस कोणत्याही प्रकारे भगवान विष्णूंची उपासना करतो तो सगळ्या सुखाचा अधिकारी होतो. त्यामुळे माणसाने नेहमी चांगल्या लोकांसोबत राहिले पाहिजे.

# स्वप्नात ' या ' ३ गोष्टी दिसल्यास मनातील इच्छा पूर्ण!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपल्या शास्त्रांमध्ये स्वप्नांना फार महत्त्व दिले गेले आहे. स्वप्नशास्त्रानुसार स्वप्ने ही केवळ मनाची कल्पना नसून, अनेकदा येणाऱ्या काळाचे संकेतही देतात.

काही स्वप्ने अशी असतात, की जी आपल्या मनातील इच्छा लवकरच पूर्ण होणार असल्याचे सूचित करतात. स्वप्नशास्त्रानुसार ' त्या ' ३ खास गोष्टी सांगितल्या जातात ज्या स्वप्नात दिसल्यास त्यांना शुभ संकेत मानले जाते.

### स्वप्नात कमळाचे फूल दिसणे

जर तुम्हाला स्वप्नात कमळाचे फूल दिसले, तर ते अत्यंत शुभ मानले जाते. कमळ हे समृद्धी, पवित्रता आणि यशाचे प्रतीक आहे. अशा स्वप्नाचा अर्थ असा, की तुमची दीर्घकाळापासूनची इच्छा पूर्ण होऊ शकते. यासोबतच जीवनात सुख-समृद्धी वाढते. मान-सन्मान आणि प्रगतीचे योगही जुळून येतात.

### स्वप्नात हत्ती दिसणे

स्वप्नशास्त्रानुसार हत्तीला शक्ती, बुद्धी आणि सौभाग्याचे प्रतीक मानले जाते. स्वप्नात हत्ती दिसला, विशेषतः शांत अवस्थेत किंवा चालताना, तर तो अतिशय शुभ संकेत मानला जातो. याचा अर्थ अडलेली कामे पूर्ण होऊ लागतात. तसेच मोठे यश मिळण्याचे योग तयार होतात. याशिवाय धन आणि पद-प्रतिष्ठेत वाढ होऊ शकते.

### स्वप्नात स्वच्छ पाणी दिसणे

जर स्वप्नात स्वच्छ, वाहते पाणी दिसले, तर ते मनःशांती आणि इच्छापूर्तीचे संकेत देते. याचा अर्थ मानसिक तणाव दूर होतो. जीवनात सकारात्मक बदल घडून येतात. तसेच मनापासून इच्छिलेली इच्छा पूर्ण होण्याचे संकेत मिळतात.

### ही स्वप्ने शुभ का मानली जातात?

स्वप्नशास्त्रानुसार अशी स्वप्ने सूचित करतात की तुमच्या जीवनातील ऊर्जा योग्य दिशेने प्रवास करत आहे. जेव्हा मन आणि कर्म दोन्ही सकारात्मक असतात, तेव्हा अशी शुभ स्वप्ने दिसतात.


**इतर महत्त्वाच्या गोष्टी :** प्रत्येक स्वप्न भविष्यवाणीच असेल असे नाही. अनेकदा स्वप्ने ही मनातील विचारांचा आणि दिवसभरातील घटनांचा परिणामही असतात. मात्र, ही स्वप्ने जर वारंवार किंवा अतिशय स्पष्ट स्वरूपात दिसत असतील, तर त्यांना शुभ संकेत मानले जाते.

# वेळीच जागे होऊन योग्य रस्त्याला लागा!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कोणत्याही कर्माची सुरूवात हेतूपासून म्हणजे वासनेपासून होत असते. जन्म हा देखील वासनेतून निर्माण होतो. गंगेचा उगम अत्यंत पवित्र आणि लहान असला तरी स्वच्छ असतो. त्याप्रमाणे आपला जन्म वासनेत झाला असला तरी सुरूवातीला मूळ स्वरूप निर्मळ असते. याचवेळी आई लहान मुलाला शिकवते, ' देवा, चांगली बुद्धी दे.' पुढे या निर्मळ मनावर निरनिराळ्या बऱ्यावाईट वासनांचे पगडे बसू लागतात. गंगेचे पाणी पुढे पुढे वाहात गेल्याने गढूळ होते. आणि ते स्वच्छ करण्यासाठी आपण ज्याप्रमाणे तुरटी लावतो, त्याप्रमाणे वासनेचा गढूळपणा घालविण्यासाठी ' राम कर्ता ' ही भावना दृढ करायला पाहिजे. भगवंताच्या नामाची तुरटी फिरल्याने वासनेचा साका खाली राहून शुद्ध अंतःकरण प्रकट होईल. ' गेल्या जन्मात मी जी काही पापे केली असतील ती आता भोगतो आहे, ' असे नुसते म्हणून जगण्यात अर्थ नाही, कारण त्यामुळे आपण पुढच्या जन्माची तयारीच करीत असतो. जर पुढचा जन्म चुकवायला असेल तर या जन्मीच त्यासाठी कार्य करायला पाहिजे; म्हणजे ती वासना नष्ट केली पाहिजे. सत्तावान, श्रीमंत, वैभववान माणसे सुखी असतात, हा नुसता भ्रम आहे. जोपर्यंत यांना भगवंताचा आधार नसतो तोपर्यंत या सर्व गोष्टी कुचकामाच्या आहेत. आपले प्रापंचिक सुख आहे ते दिसायला वरवर बाळसेदार दिसते, परंतु ती सूज आहे, ते काही खरे बाळसे नाही. म्हणूनच आपल्याला प्रपंचात सुख लागत नाही. आपले वय जसजसे वाढत जाते, तसतसे आपले व्याप वाढतात आणि परमेश्वराकडे दुर्लक्ष होते. वासना कमी होण्याऐवजी वाढत जाते, आणि तीच पुढल्या जन्माची अधिष्ठात्री ठरते. तेव्हा यातून काहीतरी मार्ग वेळेलाच काढणे आवश्यक आहे. हा मार्ग अगदी सरळ आणि सोपा आहे. संतांनी तो अनेक वेळा दाखवून दिला आहे. त्या मार्गाने पावले टाका, भगवंत पुढला मार्ग दाखवायला उत्सुक आहे. तुम्ही थोडेतरी गोडीं दाखवा, निश्चय दाखवा, तळमळ दाखवा; पुढची जबाबदारी भगवंताकडे आहे. तुम्हाला हे सर्व पटले असे म्हणता, परंतु पटले असून करीत नाही; बरे, पटले नाही म्हणावे, तर का पटले नाही तेही सांगत नाही, याला काय करावे ? मनुष्याच्या ठिकाणी इतर प्राणिमात्रापेक्षा जर काही जास्त असेल तर ते म्हणजे चांगलेवाईट कळण्याची बुद्धी. तेव्हा तुमच्या बुद्धीला पटूनही जर तुम्ही तसे वागला नाही किंवा नुसता प्रयत्नही केला नाही, तर तो दोष सर्वस्वी तुमचाच नव्हे का ? म्हणून मला पुनः सांगावेसे वाटते, की वेळेलाच जागे होऊन योग्य रस्त्याला लागा. भगवंताच्या नामात राहून सर्व काय ते करा, हेच माझे शेवटचे सांगणे आहे. नामावर बळकट श्रद्धा ठेवून परमार्थ करू. नाम न सोडता इतर गोष्टी करू.

# घरात पंचमुखी हनुमानजींचा फोटो लावण्याची योग्य दिशा कोणती?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

घरात पंचमुखी हनुमानजींचा फोटो लावणे खूप शुभ मानले जाते. मात्र फोटो लावताना योग्य दिशेची काळजी घेणे देखील महत्त्वाचे आहे. वास्तुशास्त्रानुसार पंचमुखी हनुमानजींचे चित्र लावण्यासाठी दक्षिण आणि पश्चिम दिशा उत्तम मानली जाते. पंचमुखी हनुमानजींचे चित्र लावल्याने घरातील सर्व प्रकारच्या नकारात्मक शक्तींचा नाश होतो. पंचमुखी हनुमानजींच्या प्रतिमेमुळे घरात सकारात्मक उर्जेचा संचार होतो. मनोबलही वाढते. नकारात्मक शक्तींपासून संरक्षण मिळते. पंचमुखी हनुमानजींचा फोटो घरी ठेवल्याने जीवनात अपार यश मिळते. हनुमानजींच्या कृपेने सर्व संकटे दूर होतात. वास्तुशास्त्रानुसार पंचमुख हनुमानजींचे चित्र बेडरूममध्ये ठेवू नये. पंचमुखी हनुमानजींचा फोटो घरात योग्य दिशेने ठेवल्याने घरात सुख, शांती, समृद्धी येते. मनातील भीती दूर होते. तसेच रात्री वाईट स्वप्नांना प्रतिबंधित करते. वास्तुदोषांपासूनही मुक्तता मिळू शकते, अशी भक्तांची धारणा आहे.

# धर्म म्हणजे काय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

निसर्गातीत अत्यंत पवित्र, संपूर्ण मानवी भवितव्याशी संबद्ध, जीवन व विश्व अथवा निसर्ग यांची नियंत्रक अशा अलौकिक शक्तीवर (किंवा अशा शक्तींवर) माणसाची श्रद्धा असते त्या शक्तीचा (वा शक्तींचा) स्वतःशी अनुकूल, पवित्र व घनिष्ठ संबंध स्थापित करणारी वैयक्तिक अथवा सामाजिक मनःप्रवृत्ती व त्यातून निघणारी आचरणाची पद्धती म्हणजे धर्म (रिलिजन) होय. त्या शक्तीशी (वा शक्तींशी) प्रतिकूल मनःप्रवृत्ती व आचरण म्हणजे अधर्म होय.
काही धर्मचिंतक तत्त्वज्ञांचे असे मत आहे, की धर्माच्या मुळाशी वर वर्णिलेल्या उच्चतम शक्तीकडे वळलेली मानवाची संपूर्ण मनःप्रवृत्ती असते. भावना, इच्छा आणि ज्ञान या प्रवृत्तीतूनच निर्माण होतात उच्चतम शक्तीचा विशिष्ट अनुभव काही माणसांना येत असतो या अनुभवामध्ये या शक्तीबद्दल आश्चर्य, विलक्षण भय, नितांत प्रेम, अपरंपार शांती, नम्रता, शरणागती, अहंकारनिवृत्ती म्हणजे आपण क्षुद्र किंवा कोणी नाही अशी वृत्ती इत्यादी भावना निर्माण होतात. त्या शक्तीला मनुष्य अनुकूल किंवा वश करण्याचा प्रयत्न करतो किंवा तन्मय होण्याकरिता किंवा त्या शक्तीत आत्मविसर्जन व्हावे म्हणून प्रयत्नशील असतो किंवा शाश्वत सलगी व्हावी म्हणून झटत असतो. त्याकरिता ध्यान, जप, प्रार्थना, यज्ञ, पूजा, व्रतपरिपालन इ. प्रकारचे आचरण मनुष्य व्यक्तिशः किंवा सामुदायिक रीतीने करतो आणि प्रतिकूल मनोवृत्ती व आचरण टाळतो. थोडक्यात सांगायचे म्हणजे इष्टप्राप्त्यर्थ व अनिष्टनिवारणार्थ अलौकिक शक्तीची साधना किंवा आराधना म्हणजे धर्म होय.

अलौकिक म्हणजे निसर्गातीत, निसर्गाचे व जीवनाचे नियमन करणारी, निसर्गाला अंतर्बाह्य व्यापणारी शक्ती होय. म्हणूनच तिला परमसत्य मानतात. अलौकिक म्हणजे अतींद्रिय असाही अर्थ करता येतो. ती शक्ती दृश्य वस्तुरूप आणि व्यक्तिरूपही असते आणि केव्हाकेव्हा इंद्रियगम्य किंवा मनोगम्यही होऊ शकते, अशी श्रद्धा धार्मिक आचरणाच्या मुळाशी असते. ती शक्ती हे शाश्वत आणि उच्चतम सत्य होय, असे धर्मसंकल्पनेत गृहीत धरलेले असते. मानवाचे उच्चतम ध्येय किंवा आदर्श आणि परम अंतिम शाश्वत सत्य हे त्या शक्तीचेच स्वरूप होय, असे जगातील उच्च धर्म मानतात त्या शक्तीच्या संपूर्ण अनुग्रहाने किंवा कृपेने उच्चतम शाश्वत ध्येयाची प्राप्ती होते, असेही उच्च धर्म मानतात.

जागतिक उच्च धर्मांची व्याख्या अशी करता येते, की जीवन परिपूर्ण व कृतार्थ करणारी, हे अपरिपूर्ण, दोषमय, अशांत जीवन बदलून टाकणारी, उच्चत्तम ध्येयाच्या म्हणजे दिव्यत्वाच्या प्राप्तीची पद्धती म्हणजे धर्म होय. त्या ध्येयातच शाश्वत सत्य असते, असे उच्च धर्म मानतात. एकेश्वरवादी धर्मांच्या अनुसारे परमपवित्र ईश्वर, अद्वैतवादाप्रमाणे परमात्मा आणि प्राथमिक बौद्ध धर्माप्रमाणे निर्वाण म्हणजे शाश्वत सत्य व उच्चतम ध्येय होय.

सर्वच प्राथमिक वा उच्च धर्म अलौकिक शक्तीचे दोन प्रकार मानतात : (१) पवित्र तारक वा उपकारक. उदा., माना, कॅरिझ्म, पुण्य, तीर्थंकर, बोधिसत्त्व, प्रज्ञापारमिता, देव, अहूर मज्द, ताओ, परमात्मा, अल्ला इत्यादी आणि त्याच्या उलट, (२) अपवित्र, पतनकारक अथवा अपकारक. उदा., असुर, राक्षस, पाप, सैतान, मार इ. शब्दांनी त्यांचे वर्णन करतात. अपवित्र शक्तींचा संसर्ग होणार नाही असे वर्तन करणे, हे माणसाचे कर्तव्य ठरते.
सर्व उच्च धर्मांचे तीन महत्त्वाचे विषय सांगता येतात : (१) सत्याचा वा अस्तित्वाचा संपूर्ण अर्थ व त्यात जीवनाचे स्थान अंतिम सत्य व ध्येय यांची एकरूपता. (२) जीवनाचे सत्यस्वरूप आणि जीवनाची धार्मिक परिणती किंवा रूपांतर. (३) जीवनाच्या उच्चतम उद्देशाचे साधन व जीवनातील अन्य उद्देशांची आणि त्या उद्देशांच्या साधनांची अंतिम उद्देशाशी आणि त्याच्या साधनांशी संगती घालणे आणि विसंगती टाळणे. विसंगती अपवित्र शक्तीशी संबंध आल्याने उत्पन्न होते. वर जी धर्माची सामान्य व्याख्या व उच्च धर्माची विशेष व्याख्या अशा दोन व्याख्या सांगितल्या आहेत. त्या सर्वसंमत होतील असे म्हणता येत नाही. त्याचे कारण असे, की भूतकालीन अस्तंगत मानवी समाज संस्कृतीच्या अनेक पातळ्यांवर जगत होते व त्यांच्यामध्येही निरनिराळ्या पातळीवरच्या धर्मसंस्था होत्या, असे इतिहासपूर्वकालीन संस्कृतीच्या अभ्यासकांनी म्हटले आहे. गेल्या दोनशे वर्षांत पृथ्वीवरील संस्कृतीच्या उच्चनीच पातळ्यांवर जगणाऱ्या विद्यमान मानवी समाजांमध्येही धर्म या संज्ञेस पात्र अशा संस्था आणि मानवी प्रवृत्ती आढळून येतात त्या सर्व धर्मांची व्यापक, समर्पक, सर्वसंमत व्याख्या करणे कठीण आहे. जे. एच. ल्यूबा यांनी विद्वानांच्या ४८ निरनिराळ्या व्याख्या सांगून स्वतःच्याही अधिक दोन व्याख्या सांगितल्या आहेत. त्या सर्वांचा विचार करून विल्यम जेम्स (१८४२१९१०) याने असे म्हटले आहे, की यापैकी कोणतीही व्याख्या अपुरीच पडते धर्म (रिलिजन) हा जगातील सर्व धर्मांचा केवळ समष्टिबोधक अस्पष्ट अर्थाचा शब्द आहे. भिन्नभिन्न मानवी प्रवृत्तींप्रमाणे आणि संस्कृतीच्या उच्चनीच स्तरांप्रमाणे धर्माचे प्रत्यक्ष दिसणारे स्वरूप भिन्नभिन्न दिसते, असे विल्यम जेम्सने सांगितले तरी दिव्य शक्तीकडे ओढा असलेली, स्वतःच्या असहायतेच्या जाणिवेने भरलेली माणसाची त्यागमय मानसिक प्रवृत्ती, अशी धर्माची सामान्य व्याख्या त्याने सांगितलीच. त्याच्या मते, धार्मिक

जीवनातील श्रद्धेचे पुढील पाच भाग होत. (१) दृश्य जगत हा उच्च अशा चैतन्यमय विश्वाचा भाग असून त्या विश्वाकडून या जगताला मुख्य अर्थवत्ता प्राप्त झाली आहे. (२) त्या उच्चतम विश्वाशी निगडित करणारा संवादी संबंध स्थापित करणे, आपले वास्तव ध्येय आहे. (३) त्या चैतन्याशीत्याला ईश्वर म्हणा वा नियामक तत्त्व म्हणा प्रार्थनेने किंवा अंतरंगाचा संबंध स्थापण्याने पूर्ण समाधान प्राप्त होते आणि त्यामुळे चैतन्यशक्तीचा या दृश्य विश्वात प्रवाह दिसू लागतो मानसिक व भौतिक अशी इष्ट फले प्राप्त होतात. धर्मानुभवाची फलद्रूप होणारी जी मानसिक लक्षणे उत्पन्न होतात, ती अशी : (४) नवीन उत्साह प्राप्त होतो, दिव्य सौंदर्यानुभवाने मन भारले जाते किंवा धैर्य व शौर्य निपजते. (५) पूर्ण सुरक्षिततेचे आश्वासन मिळते, शांत मनःस्थिती प्राप्त होते आणि इतरांबद्दलच्या शुद्ध प्रेमाने मन भरून जाते. जेम्सने धर्मचिंतनाचा वरील जो निष्कर्ष काढला, तो ऋषी, संत, प्रेषित, गूढानुभव घेणारे योगी इत्यादिकांच्या वैयक्तिक धर्मानुभवांच्या आधारे काढला आहे. संघटित संस्थारूप सामाजिक धर्माचे निष्कर्ष त्याने काढण्याचे टाळले आहे.
धर्माचे संस्थारूप व वैयक्तिक असे दोन प्रकार त्याने पाडले आहेत. यज्ञ वा पूजा म्हणजे कर्मकांड, देवताविषयक व्यवस्थेचे तंत्र, देवविद्या, सण व उत्सव तसेच पुरोहितसंघटना या गोष्टी संस्थारूप धर्मात मुख्यतः अंतर्भूत होतात. देवाची वा देवांची कृपा संपादन करण्याची कला, असे या धर्मास म्हणता येते. वैयक्तिक धर्म हा व्यक्तीच्या हृदयाचा धर्म असतो. देवतेची कृपा संपादन करता येणे वा अवकृपा होणे, यासंबंधी विचार यात फारसा नसतोच, देवविद्या ही यात गौण असते, आचरणाचे स्वरूप कर्मकांड हे नसते, पुरोहितसंस्थेचा संबंध महत्त्वाचा नसतो कारण भक्त किंवा योगी स्वतःच, कर्मकांड वा पुरोहितवर्ग यांच्याशिवायच, मनाने देवाशी संबंध स्थापतो. हा हृदयाचा हृदयाशी संबंध असतो परंतु संस्थारूप धर्मालाच धर्म ही संज्ञा प्राधान्याने लागू होते. त्यात वैयक्तिक धर्म हा दुय्यम अंश मानला जातो. वस्तुतः हा वैयक्तिक धर्मच सर्व धर्मांचा मूलभूत भाग आहे. ऋषी, सिद्ध, बुद्ध, ख्रिस्त, मुहंमद किंवा पंथप्रवर्तक साधुसंत यांचाच हा वैयक्तिक धर्म होय. एकांतात दिव्य तत्त्वाबद्दल आलेले अनुभव व घडणारे वर्तन या धर्माचे स्वरूप होय. हे अनुभव म्हणजे तार्किक विचार नव्हेत. त्यातून तार्किक विचार निघू शकतात. परंतु तर्कबुद्धी तेथे अपुरी पडते. मानवशास्त्रज्ञ जेम्स फ्रेझर (१८५४१९४१) याने संस्थारूप व वैयक्तिक अशा दोन्ही प्रकारच्या धर्मांना लागू पडणारी व्याख्या सांगितली आहे. जीवनव्यापी, विश्वनियंत्रक, श्रद्धेय दिव्य तत्त्वाची आराधना म्हणजे धर्म होय, असे तो म्हणतो.




(वरील माहिती विविध धर्म ग्रंथातून संकलीत केली आहे.)